# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/3753 /२०१८ पुणे शहर दिनांक 13/०४/२०१८

पुणे शहरातील खडकी वाहतुक विभागातील पुणे मेट्रोचे कामाअंतर्गत एन.सी.सी.लिमिटेड कंपनीतर्फे हॅरीश पुलाचे खाली भाऊ पाटील रोडकडुन पुणेकडे येणा-या रोडवरती मेट्रोचा एच.बी.०८ क्रमांकाचा पिलर उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, सदरचे काम हे दि. १३/०४/२०१८ रोजी पासुन ते काम संपेपर्यंत वाहतुक कोंडी होवु नये व वाहतुक सुरळित चालण्यासाठी खालील मार्गाने वाहतूक डायव्हर्शन करण्यात येत आहे.

१. मुंबई कडुन येणारा व भाऊ पाटील रोड कडे जाणारा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आहे.
२. मुंबईकडुन येणारी व भाऊ पाटील रोड कडे व औंधकडे जाणा-या वाहनांनी नाशिक फाटा येथुन पिंपळे गुरव या मार्गाचा वापर करावा.
३. मुंबईकडुन येणारी व भाऊ पाटील रोड कडे व औंधकडे जाणा-या वाहनांनी फुगेवाडी येथुन उजवीकडे वळुन दापोडी मार्गे औंध व भाऊ पाटील रोड या मार्गाचा वापर करावा.

तरी वरील प्रमाणे वाहतुक बदलाबाबत वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन पुणे शहर वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

सही/-
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर